RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

गुरुवार, ३० ऑक्टोबर २०२५ | वर्ष : ५ | अंक : २२० | दैनिक | किंमत : ₹ ५/-

Thuesday, 30 October 2025 | Year : 5 | Issue : 220 | Daily | Rate: Rs. 5/-

Sachin Sir's English Speaking

Its 100% guaranteed course

सबसे आसान तरीकेसे अंग्रेजी बोलना सिखानेके लियेही हम जाने जाते है।

9028851719

उपलब्ध आहे!

मिस्त्री, टाइल्स फिटर, पेंटर, कारपेंटर,



प्लंबर इत्यादीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.

संपर्क मो. 8482839451

# शेतकऱ्यांसाठी महाएल्गार

## सरकारला 12 वाजेपर्यंत अल्टीमेटम, महामार्गानंतर आता रेल्वे रोकोचा इशारा




**नागपूर :** आमची चर्चेची तयारी आहे. चर्चेचे दार आम्ही बंद केलेले नाही, ते सरकारने बंद केले आहेत. आज दुपारी 12 वाजेपर्यंत आम्ही वाट पाहू त्यानंतर रेल्वे रोखून दाखवू, असा आक्रमक पवित्रा आता प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी घेत सरकारला अल्टीमेटम दिलं आहे. नागपूरमध्ये बच्चू कडू , राजू शेट्टी आणि महादेव जानकर यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांनी कर्जमाफीसाठी भव्य मोर्चा काढलाय. अद्याप बच्चू कडू यांचे आंदोलन सुरूच असून अजूनही प्रहारच्या कार्यकर्त्यांनी चार मुख्य महामार्ग रोखून धरला आहे. दरम्यान, आज 12 वाजेपर्यंतचे अल्टिमेटम बच्चू कडू यांनी दिले आहे. त्यानंतर रेल्वे रोकोचा इशारा दिला आहे. कालची (28) रात्र बच्चू कडू आणि आंदोलकांनी जामठा येथे महामार्गावरच काढली आहे. त्यामुळे येत्या 12 वाजेपर्यंत सरकार नेमकं काय भूमिका घेतं हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. सरसकट कर्जमाफी, सातबारा कोरा करा, दिव्यांगांना न्याय द्या, या व अन्य अशा 20 प्रमुख मागण्यांसाठी आक्रमक झालेले माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या महा एल्गार आंदोलनामुळे वर्धा, चंद्रपूर, हैदराबादसह अमरावती आणि जबलपूर महामार्गावरील वाहतूक मंगळवारी सायंकाळी सहा नंतर पूर्णतः ठप्प झाली. आक्रमक झालेले शेतकरी संपूर्ण वर्धा मार्गावर ठिय्या मांडून बसले आहेत. जामठा येथील कापूस संशोधन केंद्राच्या 30 एकर मैदानासह संपूर्ण वर्धा मार्गावर आंदोलक पसरल्याने नागपूरकडे येणारी सर्व वाहतूक जागच्या जागी खोळंबली आहे. संभाव्य परिस्थिती पाहता आंदोलक समृद्दी महामार्गावर पोहोचू नये यासाठी पोलीसांनी समृद्धीच्या आरंभबिंदूकडे जाणारा मार्गही पूर्णतः बंद केला आहे. विदर्भासह मराठवाड्यातील 25 हजारांहून अधिक शेतकरी एल्गारच्या तयारीने मैदानात उतरल्याने सरकारला देखील धडकी भरल्यासारखी परिस्थिती आहे. वर्धेसह, चंद्रपूर, हैदराबाद आणि जबपूरवरून बाह्यवळण रस्ता मार्गे नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटकडून अमरावतीच्या दिशेने जाणारी आणि तिकडू येणारी सर्व वाहतूक व्यवस्था ठप्प पडली आहे.जबललपूर - हैदराबाद महामार्ग बच्चू कडू यांच्या सोबत दाखल झालेल्या आंदोलकांनी रोखून धरल्याने दोन्ही रस्त्यांवर दोन्ही बाजूला अनेक किमीपर्यंत वाहतूक कोंडी झाली आहे.. त्यामुळे खाजगी वाहनांनी किंवा st बसेस ने प्रवास करणाऱ्या सामान्य नागरिकांची मोठी अडचण झाली आहे.. तसेच धान्य, दूध, भाजीपाला, व इतर अत्यावश्यक वस्तू घेऊन जाणारे अनेक ट्रक्स ही महामार्गावर थांबून आहे. या आंदोलनाचा सर्वाधिक फटका सामान्य नागरिकांना बसत असून प्रवाशांचे हाल होत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे सरकारने यावर लवकर तोडगा काढावा अशी भावना व्यक्त केली जात आहे. बच्चू कडू आणि त्यांच्या आंदोलकांमुळे फक्त नागपूर - वर्धा महामार्गावरच कोंडी झालेली नाही, तर एका बाजूला नागपूर-अमरावती आणि दुसऱ्या बाजूला नागपूर - रायपूरला दरम्यानचे जे दोन समांतर महामार्ग आहे, त्यांना जोडणाऱ्या आऊटर रिंग रोडवर ही आंदोलन सुरू झाले आहे. त्यामुळे आऊटर रिंग रोडवर ही कित्येक किलोमीटरपर्यंत ट्रक आणि अत्यावश्यक वस्तू घेऊन जाणाऱ्या वाहनांची कोंडी झाली आहे.

### बच्चू कडू, राजू शेट्टी, महादेव जानकर रस्त्यावरच झोपले...

प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्यासह स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी , वामनराव चटप , माजी मंत्री महादेव जानकर नागपूर येथे आंदोलनस्थळी शेतऱ्यांच्यासोबत रात्रभर रस्त्यावरच झोपले. बच्चू कडू यांचे आंदोलन सुरूच आहे. महामार्ग अजूनही रोखून धरले आहे, कालची रात्र बच्चू कडू आणि आंदोलकांनी जामठा येथे महामार्गावर काढली आहे. मंगळवारच्या तुलनेत बुधवारी तुलनेत गर्दी कमी झाली असली तरी शेकडो ट्रॅक्टर आणि वाहनांसह आंदोलन महामार्ग रोखून बसले आहे.



## शेतकरी आंदोलनाची हायकोर्टाकडून गंभीर दखल



**नागपूर :** वर्धा रोडवर सुरू असलेल्या प्रचंड आंदोलनामुळे निर्माण झालेल्या वाहतूक कोंडीवर नागपूर खंडपीठाने बुधवारी स्वतःहून दखल घेतली आणि तातडीचे आदेश देत माजी आमदार ओमप्रकाश उर्फ बच्छू कडू यांना व त्यांच्या समर्थकांना लगेच रस्ता मोकळा करण्याचे निर्देश दिले. न्यायाधीश राजनिश आर. व्यास यांच्या खंडपीठास वृत्तपत्रांमधील बातम्यांमधून ही माहिती मिळाली. न्यायालयाने नमूद केले की, या महामार्गावरूनच नागपूर विमानतळ, नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट, सुरेटेक हॉस्पिटल आणि अनेक शाळा आहेत, तसेच हा रस्ता पुढे समृद्धी महामार्गाशी जोडला जातो. त्यामुळे अशा प्रकारे राष्ट्रीय महामार्ग रोखणे म्हणजे नागरिकांच्या संविधानात दिलेल्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन होय, असे न्यायालयाने स्पष्टपणे नमूद केले. सुनावणीदरम्यान न्यायालयाने नोंदवले की, बेलतरोडी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक यांनी 26 ऑक्टोबर 2025 रोजी ओमप्रकाश उर्फ बच्छू कडू यांना 28 ऑक्टोबर रोजी सकाळी 11 वाजता मौजा पारसोडी येथील कॉटन रिसर्च सेंटरलगत आंदोलन करण्याची परवानगी दिली होती. ही परवानगी केवळ एका दिवसापुरती होती. मात्र, आंदोलन पुढील दिवशी (29 ऑक्टोबर) देखील सुरूच असल्याचे दिसून आले. न्यायालयाने म्हटले की, 'परवानगी संपल्यानंतरही आंदोलन सुरू ठेवणे हे कायद्याचे उल्लंघन आहे आणि त्यामुळे नागरिकांना होणारा त्रास असह्य झाला आहे.' न्या. व्यास यांनी निरीक्षणात म्हटले की, न्यायव्यवस्थेची भूमिका केवळ न्यायदानापुरती मर्यादित नसून, ती नागरिकांच्या मूलभूत अधिकारांची रक्षणकर्ता म्हणून सक्रिय असली पाहिजे. तथापि, आंदोलनकर्त्यांच्या अभिव्यक्तीच्या आणि निदर्शनांच्या अधिकारांकडेही दुर्लक्ष करता येणार नाही. परंतु सार्वजनिक रस्ता – विशेषतः राष्ट्रीय महामार्ग – रोखून आंदोलन करणे हे इतर नागरिकांच्या स्वातंत्र्याचा भंग ठरते.

## शेतकरी मोर्चात रविकांत तुपकरांचे वादग्रस्त वक्तव्य



**नागपूर :** शेतकरी कर्जमाफीच्या मागणीसाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली आज नागपुरात सीमेवर मोर्चा काढला. मोर्चात प्रमुख शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी आक्रमक भाषण करून राज्य सरकार आणि मंत्र्यांवर तीव्र टीका केली. 'विधानसभेची निवडणूक होऊन एक वर्ष पूर्ण झाले, परंतु शेतकऱ्यांची कर्जमुक्ती का झाली नाही ? आम्ही भीक मागायला आलेलो नाही; हा आमचा नैतिक हक्क आहे, असे त्यांनी ठामपणे म्हटले. तुपकरांनी सोयाबीन, कापूस आणि ऊस यांसारख्या मुख्य पिकांवरील आर्थिक दुर्गत गोष्टींचा उल्लेख करत शेतकऱ्यांच्या आर्थिक संकटाचे दृश्य उभे केले. 'आज सोयाबीनचा एक क्विंटल उत्पादन खर्च सुमारे साडे सात हजार इतका येतो, पण बाजारात कारभारामुळे तीन ते साडेतीन हजार रूपये भाव मिळत आहेत. जसे बच्चू भाऊ म्हणाले की दोन-चार आमदारांना कापा, तसंच मी सांगतो – दोन-चार मंत्र्यांना कापा. आता मागे हटायचं नाही.' या वाक्यांनी सभेत उठावाचा वेग वाढवला तर विरोधकांकडून तीव्र टीकेचा अंदाजही व्यक्त केला जातोय. तुपकरांनी पुढे सांगितले की, 'आता शेतकरी आत्महत्या करणार नाही; आम्ही लढणार आहोत. सरकार आमच्याशी नीट वागणार नाही तर आम्ही सरकारच्या दारातच चर्चा मागू.'

## अंधारात शेतकरी, प्रकाशात लावणी

**नागपूर :** राज्यात अलीकडे झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांनी दिवाळी अंधारात घालवली, काहींनी तर आत्महत्याही केल्या. अशा संवेदनशील काळात नागपूरमध्ये अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयात 'लावणी कार्यक्रमासह दिवाळी मिलन' साजरे झाले. यामुळे या पक्षावर 'असंवेदनशीलतेची' टीका होत आहे. सार्वजनिक जीवनात वावरणाऱ्या राजकीय पक्षाची किंवा या पक्षाच्या नेत्यांची लोकांच्या सुख-दुःखाशी नाळ जोडली पाहिजे, ही अपेक्षा असते. महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी शेतकऱ्यांच्या दुःखद स्थितीमुळे दिवाळी न साजरी करण्याचा निर्णय घेतला, ही बाब त्यांच्यातील 'संवेदनशील नेतृत्व' दर्शवते. पण त्यांच्याच पक्षातून फूटून वेगळी चूल मांडणाऱ्या पण अजित पवार गटाच्या नागपूरमधील कार्यकर्त्यांनी अगदी उलट दिवाळी साजरी करून 'राजकीय असंवेदनशीलता' प्रदर्शित केली, अशी टीका आता होऊ लागली आहे. सत्तेत आलेल्या गटांकडून 'संवेदनशीलता' ही केवळ दिखाऊ ठरते, असा संदेश यामुळे जनतेपर्यंत गेला आहे. एकीकडे शेतकऱ्यांच्या समस्या, दुसरीकडे ऐशआरामाचे कार्यक्रम असे पक्षाचे विरोधाभासाचे चित्र नागपूरमधून राज्यभर गेले आहे.. .




## महत्त्वाच्या बातम्या

### नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) अंतर्गत विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेतून शिक्षण देण्यावर भर असून, भारतातील ग्रामीण व आदिवासीभागात मुलांना त्यांच्या बोली भाषेतून कथांच्या माध्यमातून शिकवणे सुरु आहे.

महाराष्ट्रात त्रिभाषा धोरण समिती कार्यरत आहे. या धोरणाद्वारे विद्यार्थ्यांना विविध भाषा शिकवण्यावर जोर दिला जात आहे आणि 20 वर्षांसाठी दूरदृष्टिकोन ठेवण्यात आला आहे.

सरकारी शाळांमध्ये देशभरातील 56 टक्के विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, ग्रामीण भागात ही संख्या 66 टक्के पर्यंत आहे .विद्यापीठ आणि शाळांमध्ये योग, आयुर्वेद, इंग्रजी साक्षरता, डिजिटल लर्निंग, शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये बदल तसेच जात वैधता प्रमाणपत्रासाठी मुदतवाढ यासारखे अनेक उदार निर्णय आणि उपक्रम राबवले जात आहेत.

2025 साली सातवा आंतरराष्ट्रीय शिक्षण दिन AI आणि मानवी एजन्सी या थीमवर साजरा झाला. UNESCO आणि UNGA ने AI च्या वापरावर मानवाचा नियंत्रण राखण्याची गरज व्यक्त केली .

जागतिक स्तरावर सर्वसमावेशक, डिजीटल तंत्रज्ञानावर आधारित न्याय्य शिक्षणासाठी आशय व धोरण ठरवले जात आहे .

शिक्षणाच्या अतिरिक्त वर्षामुळे जागतिक स्तरावर कमाईत 10 टक्के वाढ होते; तसेच दीर्घकालीन आर्थिक विकास, संशोधन, सामाजिक सलोखा साधण्यात शिक्षणाची महत्त्वाची कामगिरी आहे. शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश, अभ्यासक्रम, शिष्यवृत्ती, संशोधन आणि दीक्षांत समारंभ यांसारख्या विविध उपक्रमांची माहिती देशोदेशी समोर येत आहे.

सामाजिक अभ्यास आणि जागतिक शिक्षणआंतरराष्ट्रीय शिक्षण अद्ययावत राहणे व विविध संस्कृती, सामाजिक, राजकीय, आर्थिक, पर्यावरणीय नातेसंबंध समजणे महत्त्वाचे आहे; जागतिक कनेक्टीव्हिटी वाढू लागल्याने शिक्षणाचे स्वरूप व्यापक होत आहे.

## मसूद अजहर तयार करतो महिलांची दहशतवादी संघटना




**नवी दिल्ली :** पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मद आता महिलांना देखील दहशतवादी कारवायांसाठी तयार करत आहेत. 'जैश'चा म्होरक्या मौलाना मसूद अजहर याच्या भाषणाचा 21 मिनिटांचा एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे. पाकिस्तानमधील बहावलपूरमध्ये त्याने नुकतंच भाषण केले. यामध्ये अजहरने जैशच्या महिला शाखेची घोषणा केली आहे. 'जमात-उल-मोमिनात' या योजनेअंतर्गत जैशने महिलांची दहशतवादी टोळी बनवण्याचा कट रचला आहे. मसूद अजहरच्या योजनेअंतर्गत महिलांना प्रशिक्षण दिलं जाईल, त्यांचे ब्रेनवॉशिंग करणे आणि त्यांचा दहशतवादी कारवाया व युद्धात वापर करण्यासाठीची ब्लूप्रिंट तयार करण्यात आली आहे. अजहरने म्हटले आहे की 'संघटनेत दाखल झालेल्या तरुणांना 15 दिवसांचा 'दौरा-ए-तरबियत' हा कोर्स पूर्ण करावा लागतो. यामध्ये त्यांना भारताविरोधातील जिहादसाठी तयार केले जाते, त्यांचे ब्रेनवॉश केले जाते. आता महिलांसाठी 'दौरा-ए-तस्किया' हा कोर्स सुरू करण्यात आला आहे. बहावलपूरमधील मर्कजमध्ये महिलांना प्रशिक्षण दिले जाईल.'

## ओला इलेक्ट्रिक कंपनी ईस्ट इंडिया कंपनीपेक्षाही वाईट : विरोधी पक्षाचे वकिल




**कर्नाटक :** ओला इलेक्ट्रिक कंपनीतील 38 वर्षीय कर्मचाऱ्याने कंपनीतील छळाला कंटाळून आत्महत्या केली. यानंतर आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी ओलाचे संस्थापक आणि सीईओ भाविश अग्रवाल आणि ओलाचे अधिकारी सुब्रत कुमार दास यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर एफआयआर रद्द करावा, या मागणीसाठी ओला इलेक्ट्रिकने कर्नाटक उच्च न्यायालयात धाव घेतली. दरम्यान आज कर्नाटक उच्च न्यायालयात यासंबंधी सुनावणी झाली असताना विरोधी पक्षाच्या वकिलाने ओला ही ईस्ट इंडिया कंपनीपेक्षा वाईट कंपनी असल्याचे म्हटेल. 28 सप्टेंबर रोजी ओला इलेक्ट्रिकमध्ये होमोलोगेशन इंजिनिअर म्हणून काम करत असलेल्या के. अरविंद (वय 38) याने राहत्या घरात आत्महत्या केली. अरविंदच्या मृत्यूनंतर त्याच्या कुटुंबियांना एक सविस्तर सुसाइड नोट सापडली. ज्यामध्ये अरविंदने वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कामाच्या ठिकाणी सतत छळ आणि दबाव आणल्याचा आरोप केला होता. त्यानंतर 6 ऑक्टोबर रोजी अरविंदचा मोठा भाऊ अश्विन कन्नन यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. भाविश अग्रवाल यांची बाजू कोर्टात मांडणारे वकील एस. एस. श्यामसुंदर यांनी सांगितले की, सदर एफआयआर रद्द करण्यात यावा. आधी अनैसर्गिक मृत्यू म्हणून या प्रकरणाची नोंद झाली होती. त्यानंतर एफआयआर बदलता येत नाही. त्यांनी पुढे म्हटले की, ओलाने सदर कर्मचाऱ्याचे सर्व थकबाकी चुकती केली आहे. तसेच या घटनेमुळे कंपनीचे मोठे नुकसान होत आहे. अनेक कर्मचारी कंपनी सोडत आहेत, तर शेअर्सच्या किंमती खाली आल्या आहेत.

## मोमीनपुरा उड्डाणपुलाचे काम ठप्प; काँग्रेस कार्यकर्त्यांनी अधिकाऱ्यांवर फेकले फुल



**नागपूर :** शहरातील मुस्लिम बहुल मोमीनपुरा परिसरातील उड्डाणपुलाचे काम गेल्या तीन वर्षांपासून ठप्प पडले आहे. या ठप्प कामामुळे मोतीबाग ते मोमीनपुरा या मुख्य रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. रस्त्यांवर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडल्याने नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः ॲम्बुलन्स, शाळेच्या बस तसेच आपत्कालीन वाहतूक या मार्गावरून नेणे अतिशय कठीण झाले आहे. या समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी स्थानिक काँग्रेस कार्यकर्त्यांनी अनोखा मार्ग अवलंबला. त्यांनी महारेल (महाराष्ट्र रेल्वे इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड) च्या अधिकाऱ्यांवर पुष्पवर्षाव करून त्यांचे फुलांच्या उधळणीने स्वागत केले. या कृतीद्वारे त्यांनी अधिकाऱ्यांना सकारात्मक संदेश देत तातडीने उड्डाणपुलाचे अपूर्ण काम पूर्ण करण्याची मागणी केली.
काँग्रेस नेत्यांचे म्हणणे आहे की, उड्डाणपुलाच्या कामातील विलंबामुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले असून वाहतुकीच्या समस्येमुळे अपघातांच्या घटनाही वाढल्या आहेत. प्रशासनाने तातडीने काम पूर्ण करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. महारेलने डिसेंबर 2025 पर्यंत काम पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवले होते, मात्र आता ते डिसेंबर 2026 पर्यंत पुढे ढकलण्यात आले आहे. 2.82 किलोमीटर लांबीचा आणि सुमारे 146 कोटी रुपये खर्चाचा हा उड्डाणपूल कडबी चौक ते गोलिबार चौकदरम्यान वाहतुकीची कोंडी कमी करण्यासाठी महत्त्वाचा मानला जातो. प्रकल्पात संत्रा मार्केटकडे जाणारा 'वाय' आकाराचा हातही समाविष्ट आहे, ज्यामुळे वाहतुकीसाठी प्रवेश व निर्गमन अधिक सुलभ होईल.

## आर्थिक धोरणांना लक्ष्य करत राहुल गांधींची मोदी आणि नितीश कुमार यांच्यावर जोरदार टीका

**पाटणा :** बिहार विधानसभा निवडणूक प्रचाराची जोरदार सुरुवात करताना, लोकसभेचे विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना लक्ष्य केले आणि ते 'मतांसाठी काहीही' करत असल्याचा आरोप केला.
'जर तुम्ही नरेंद्र मोदींना तुमच्या मतांच्या बदल्यात नाचायला सांगितले, तर ते व्यासपीठावर नाचतील', असे राहुल गांधी यांनी मुझफ्फरपूरमध्ये राष्ट्रीय जनता दलाचे नेते आणि महाआघाडीचे मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार तेजस्वी यादव यांच्यासोबत एका संयुक्त सभेत बोलतांना म्हटले.
विधानसभा निवडणुकीला अवघा एक आठवडा उरला असताना, राहुल गांधींनी प्रधानमंत्री मोदी आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्यावर जोरदार टीका केली. बिहारी लोकांसाठी सर्वात मोठा सण असलेल्या छठ पूजेकडे लक्ष वेधले. ते म्हणाले की, भाविक दिल्लीतील प्रदूषित यमुनेत प्रार्थना करत होते, तर प्रधानमंत्रींनी खास त्यांच्यासाठी बनवलेल्या विशेष तलावात डुबकी मारली.
यावेळी राहुल गांधींनी बिहारमध्येही असाच प्रयत्न होऊ शकतो असा इशारा देत, मतचोरीचा आरोप पुन्हा केला. ते म्हणाले, 'ते तुमची मते चोरण्यात गुंतले आहेत. त्यांनी महाराष्ट्र आणि हरियाणा विधानसभा निवडणुकीत मतचोरी केली आणि ते आता बिहारमध्येही मतचोरीचा प्रयत्न करतील.'
प्रधानमंत्री मोदींच्या आर्थिक धोरणांना लक्ष्य करत राहुल गांधींनी असा दावा केला की, भाजपा सरकारने नोटाबंदी आणि जीएसटीद्वारे लहान व्यवसाय उद्ध्वस्त केले आहेत.
'तुमच्या फोनच्या मागे काय लिहिले आहे ते सांगा?' असे राहुल गांधींनी उपस्थितांना विचारले. *'मेड इन चायना. आम्ही म्हणतो की ते मेड इन चायना नसावे, ते मेड इन बिहार असावे. मोबाईल, शर्ट, पॅन्ट सर्व काही बिहारमध्ये बनवले पाहिजे, जेणेकरून तरुणांना नोकऱ्या मिळतील,'* असे ते म्हणाले.





> 'नरेंद्र मोदी त्यांच्या स्विमिंग पूलमध्ये स्नान केले. त्यांचा यमुनेशी काहीही संबंध नाही. त्यांचा छठ पूजेशी काहीही संबंध नाही. त्यांना फक्त तुमची मते हवी आहेत अशी टीका राहुल गांधींनी केली. नीतीशजींचा चेहरा वापरला जात आहे. पण, रिमोट कंट्रोल भाजपाच्या हातात आहे. तुम्ही असा विचार करू नका की ते सर्वात मागासलेल्या लोकांचा आवाज ऐकतात. भाजपाच्या हातात रिमोट कंट्रोल आहे आणि त्यांचा सामाजिक न्यायाशी काहीही संबंध नाही.
> – राहुल गांधी



प्रिय पदवीधर मतदार बंधु आणि भगिनींनो

2026 मध्ये होणाऱ्या विधान परिषद पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीसाठी मतदार नोंदणी प्रक्रिया सुरु झालेलली आहे

नोंदणीची करण्याची अंतिम तारीख: 06 नोव्हेंबर 2025

नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे:

1. पदवी प्रमाणपत्र/अंतिम वर्षाची मार्कशीट (1 नोव्हेंबर 2022 पूर्वी पदवीधर झालेले पात्र)
2. रहिवासी दाखला: वीज बिल/आधार
3. ओळखपत्र: आधार, ड्रायविंग लायसन्स, पॅनकार्ड
4. पासपोर्ट साइज फोटो
5. लग्न झालेल्या महिला ज्यांचे आडनाव बदललेले आहे, त्यांना राजपत्र, लग्नानंतर बनवलेले पॅनकार्ड आवश्यक आहे

अधिक माहितीसाठी खालील मोबाइल नंबर वर मेसेज पाठवा:

7249527922

खालील पोर्टल वर पदवीधर मतदान नोंदणी चा फॉर्म नं. 18 उपलब्ध आहे:

https://ceoelection.maharashtra.gov.in/Downloads/DownloadForms/Form-18.pdf

“ जर तुम्हाला एखाद्या महिलेला आनंदी करायचे असेल तर तिला स्वातंत्र्य आणि शिक्षण द्या... ”



## संपादकीय

### शेतकऱ्यांनी जिरवली सरकारची, की अप्रत्यक्ष सत्तासहयोगाचा प्रश्न?

अमरावतीपासून सुरू झालेला आणि नागपुरात संपलेला बच्चू कडू यांचा 'महा एल्गार मोर्चा' गेल्या काही दिवसांत महाराष्ट्राच्या राजकारणाचे केंद्रबिंदू ठरला आहे. हा मोर्चा केवळ शेतकऱ्यांच्या मागण्यांचा आवाज नव्हता – तो ग्रामीण महाराष्ट्राच्या असंतोषाचा, दुर्लक्षित भागांच्या उपेक्षेचा आणि सरकारच्या बेफिकीरी विरुद्धचा स्फोट होता. परंतु, या मोर्च्याने एक नवीन प्रश्नही निर्माण केला – हा खरोखरच सरकारविरोधी मोर्चा होता का, की काही सत्ताधाऱ्यांनी राजकीय समीकरणे बदलण्यासाठी त्याला अप्रत्यक्ष पाठबळ दिले ? मोर्च्यात मांडलेल्या प्रमुख मागण्या सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या होत्या, त्यात पीकविमा योजनेतील अन्याय थांबवणे – शेतकऱ्यांना हक्काचा भरपाईचा पैसा न मिळणे, कंपन्यांचा नफा आणि शेतकऱ्यांचा तोटा हा आजचा वास्तव.

वीज बिल माफी – सतत वाढणारी दरपत्रक आणि थकीत बिलांची जबाबदारी शेतकऱ्यांच्या डोक्यावर. हमीर भावाची अंमलबजावणी – बाजारभाव आणि उत्पादन खर्च यांच्यातील तफावत शेतकऱ्यांना कर्जाच्या जाळ्यात ओढते. दुष्काळग्रस्तांना तातडीची आर्थिक मदत. या मागण्या कोणत्याही पक्षाच्या नव्हत्या; त्या महाराष्ट्राच्या मातीतून उठलेल्या होत्या. बच्चू कडू यांची शैली नेहमीच लोकाभिमुख आणि आक्रमक राहिली आहे. त्यांनी शेतकऱ्यांच्या आंदोलनाला 'दाद देणे' आणि 'सरकारला झोपेतून उठवणे' हे ध्येय ठेवले. मोर्च्यात त्यांचा संवाद साधण्याचा, पण त्याचवेळी सरकारला इशारा देण्याचा संतुलित प्रयत्न दिसून आला. त्यांनी थेट सांगितले, 'आम्ही सरकारविरोधी नाही, पण सरकारने शेतकऱ्यांविरोधात काम केले, तर मग आम्ही कोणाचंही ऐकणार नाही.' ही ओळच या आंदोलनाचा गाभा होती – लोकशाहीतील दबाव-राजकारणाचा प्रभावी नमुना. राजकीय विश्लेषकांच्या दृष्टीने मात्र या मोर्च्याचे अनेक स्तर आहेत. काही निरीक्षकांचे म्हणणे आहे की, या मोर्च्याला सत्ताधाऱ्यांची अप्रत्यक्ष साथ होती. त्यामागील काही मुद्दे विचारात घेता येतातः मोर्च्यासाठी परवानगी मिळण्यात कोणताही अडथळा आला नाही, जे साधारणपणे विरोधी आंदोलनेत होते. काही सत्ताधारी आमदारांनीही 'शेतकऱ्यांच्या प्रश्नावर बच्चू कडूंच्या मागण्या योग्य आहेत' असे जाहीर विधान केले. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागात नाराजी कमी करण्यासाठी हा मोर्चा 'लोकशाहीतील नियंत्रित दाब-विसर्जन' म्हणून वापरला गेला, अशी राजकीय चर्चा आहे.

सरकारला थेट विरोध न करता 'जनतेचा आवाज ऐका' असा संदेश देण्यामुळे हा मोर्चा 'विरोधात नाही, पण दबाव निर्माण करणारा' ठरला. यामुळे अनेकांचे मत आहे की, हा मोर्चा 'शेतकऱ्यांचा इशारा' असला तरी त्याला सत्तेतील काही गटांची शांत पाठराखण होती. मोर्च्यात हजारो शेतकरी, तरुण, महिला आणि विविध संघटनांचा सहभाग होता. परंतु, सर्वात मोठा पैलू म्हणजे शिस्त – कुठेही हिंसाचार नाही, प्रशासनाशी संघर्ष नाही. अनेकांनी याला 'सुसंस्कृत एल्गार' असे म्हटले. हे आंदोलन म्हणजे 'जनतेचा दबाव आणि लोकशाहीचा सन्मान' यांचा उत्कृष्ट संगम होता. सरकारने प्रारंभी दुर्लक्ष केले, पण जेव्हा नागपुरात हजारो शेतकरी दाखल झाले, तेव्हा मंत्रालयातील बैठका रंगल्या. शेवटी काही मागण्यांवर सकारात्मक आश्वासने देण्यात आली, परंतु शेतकरी संघटनांना आता 'वचन नव्हे, कृती हवी' असा निर्धार आहे. अमरावती जिल्ह्यातील दर्यापुर तालुक्यातील शेतकरी संतोष हरणे यांनी 2023 मध्ये सोयाबीन पीक घेतले होते. दुष्काळामुळे नुकसान झाले, परंतु विमा कंपनीने दावा नाकारला. त्यांनी कडू यांच्या मोर्च्यात सहभागी होत सांगितले – 'सरकारच्या योजनांचा लाभ आम्हाला फक्त जाहिरातींमध्ये दिसतो. आमचे फॉर्म, आमचे अर्ज, सगळे वेळेवर दिले तरी भरपाई नाही.' अशा हजारो उदाहरणांनी मोर्च्याला भावनिक आणि नैतिक बळ दिले. 'महा एल्गार मोर्चा'ने महाराष्ट्राच्या राजकारणाला नवा टप्पा दिला आहे. तो फक्त आंदोलन नव्हता – तो ग्रामीण महाराष्ट्राच्या धडधडत्या हृदयाचा आवाज होता. सरकारने आता 'शेतकऱ्यांच्या वेदना' समजून घेतल्या नाहीत, तर हा एल्गार 'जनतेचा बंड' होण्यास वेळ लागणार नाही. बच्चू कडू यांनी मोर्चाच्या माध्यमातून सरकारलाही इशारा दिला आणि शेतकऱ्यांनाही आत्मविश्वास दिला. त्यामुळे हे स्पष्ट आहे – शेतकऱ्यांनी सरकारला जिरवले, आणि काही सत्ताधाऱ्यांनी या एल्गारातून आपली राजकीय बुद्धिबळाची चाल खेळली! ■ ■

## तीन प्रश्न, एक उत्तर! चलो बुद्ध की ओर !

भारतातल्या आणि भारताच्या आसपासच्या पर्वतरांगांमध्ये, डोंगरांमध्ये ज्या अगणित लेण्या, स्तूप, चैत्यगृहे आढळतात त्यात नक्की काय आहे? देशभरात आणि देशाच्या आजूबाजूच्या परिसरात जी असंख्य मंदिरे/देवळे दिसतात ती नक्की कुणाची आहेत? या सर्व ठिकाणी देवाचे/देवीचे फक्त डोळे दिसतील इतपतच जागा उघडी ठेवून मूर्तीचा उर्वरीत सर्व भाग कपड्यांनी आणि दागिन्यांनी नखशिखान्त मढवून का टाकला जातो? काय झाकायचे/लपवायचे आहे? भारतीय उपखंडात विविध भाषांत विपुल प्रमाणात जे धार्मिक वाङ्मय उपलब्ध आहे त्यात नक्की कोणते विचार सामावलेले आहेत? किंवा कुणाच्या विरुद्धचे विचार सामावलेले आहेत? वरील तिन्ही प्रश्नांचे उत्तर एकच आहे. ते म्हणजे - बुद्ध आणि त्याचा धम्म! सगळा भारतीय भूगोल बुद्धाने आणि त्याच्या धम्माने व्यापलेला आहे, बुद्ध आणि त्याचा धम्मच भारतीय इतिहासाचा गौरवशाली गाभा आहे, भारतात घडलेल्या जवळपास सर्व सांस्कृतिक घडामोडी बुद्धाच्या आणि धम्माच्या संदर्भात किंवा विरोधात घडल्या आहेत, या आशयाची विधाने स्वामी विवेकानंद, लाल मणी जोशी, राहुल सांकृत्यायन, प्रबोधनकार ठाकरे अशा अनेक निःपक्षपाती/प्रामाणिक विद्वानांनी केलेली असून ती निर्विवादपणे सत्य आहेत.

प्राचीन इतिहास मुख्यतः तीन साधनांच्या आधारे उलगडला जातो. एक पुरातत्त्वशास्त्राद्वारे (Archaeological) हाती लागणारा इतिहास, दुसरा लिखित वाङ्मयीन (Literature) साहित्यातून समोर येणारा इतिहास आणि तिसरा मौखिक परंपरेतून (Oral tradition) मागच्या पिढीकडून पुढच्या पिढीकडे पोहोचणारा इतिहास. या तिन्ही साधनांच्या साहाय्याने भारताच्या इतिहासाचे/भूगोलाचे वारंवार उत्खनन केल्यानंतर आणि त्याचा वारंवार अन्वयार्थ लावल्यानंतर एव्हाना एक गोष्ट निखालसपणे सिद्ध झाली आहे ती म्हणजे भारतात आणि एकूण आशिया खंडात शेकडो वर्षे बौद्ध धम्म नांदत होता आणि त्याचा सर्वनाश करण्याचा, त्याचे मूळ रूप बदलण्याचा, त्याचा विपर्यास करण्याचा, त्याच्यावर भलत्याच गोष्टी थोपविण्याचा प्रयत्न सतत झाला होता. भारताचा सांस्कृतिक इतिहास हा मुख्यतः याच संघर्षाचा इतिहास आहे.




या सांस्कृतिक संघर्षातील एक बाजू वर म्हटल्याप्रमाणे भारतीय 'मातीत' आणि 'मतीत' खोलवर रुजलेल्या बौद्ध धम्माची असून प्रज्ञा, विवेक, समता आणि करुणा ही त्याची मूल्यतत्त्वे आहेत. अलीकडच्या काळात भाषिक अवकाशात मानवी मनाच्या प्रगल्भ अवस्थेचे वर्णन करण्यासाठी 'शहाणीव' नावाचा जो शब्द प्रचलित झाला आहे तो बुद्धिझमप्रणित विवेकी जाणिवेचाच गोळीबंद अर्क आहे! ही मूल्यात्मक शहाणीव हाच भारतीय संस्कृतीचा आद्य वसा आणि वारसा आहे. हा वसा-वारसा उद्ध्वस्त करू पाहणारी दुसरी बाजू अर्थातच वैदिक धर्माची आहे. वेदप्रामाण्य, यज्ञयाग, अंधश्रद्धा, विषमता, शोषण आणि हिंसा ही त्याची शस्त्रंतत्त्वे आहेत. या संघर्षात हे दोघेच नाहीत, तर इतरही अनेक छोटेछोटे विचारप्रवाह आहेत. ते अधूनमधून बाजू बदलताना, पक्षांतर करतानाही दिसतात. परंतु त्यामुळे मुख्य लढाईचे स्वरूप बदलत नाही. मुख्य झगडा बौद्ध आणि वैदिक यांच्यातच होत आलेला आहे आणि आजही तो थांबलेला नाही. या प्रदीर्घ संघर्षाकडे आज 'आम्ही भारतीय लोक' कसे पाहतो? यापैकी कुणाचा कैवार घेतो? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केल्यास खेदजनक परिस्थिती समोर येते. वर उल्लेख केलेल्या तिन्ही साधनांनी भारतीय भूगोलाचे आणि इतिहासाचे चित्र सूर्यप्रकाशासारखे स्पष्ट केलेले असतानादेखील त्याकडे तमाम भारतीय लोक, विशेषतः बौद्धिक नेतृत्त्व करणारे, समाजाला वैचारिक दिशा देणारे, जनमानस घडविणारे प्रागतिक लोक अतिशय नकारात्मक मानसिकतेने बघत असल्याचे आढळते. जे भारताच्या भूगोलाच्या कणाकणात आणि इतिहासाच्या पानापानात आहे आणि जे अभ्यास-संशोधनातून क्लियरकट सिद्ध झाले आहे ते स्वीकारायचे म्हटले की ते अचानक नर्व्हस होतात! त्यांचा पवित्रा एकदम बुद्धविरोधी आणि धम्मविरोधी बनतो! त्यांना फासावर चढविण्यासाठी नेले जात आहे, अशा नजरेने ते पाहू लागतात! प्रश्न हा आहे की, भारतीय माणसाला त्याच्या मूळ इतिहासाशी जोडण्याचा, त्याद्वारे त्याच्या हातात त्याचा उज्ज्वल वारसा ठेवण्याचा प्रयत्न केला असता तो अस्वस्थ का होतो? इतके आढेवेढे का घेतो? या आढ्यावेढ्यांमागे नेमके कोणते गौडबंगाल आहे? जे अज्ञानी आहेत त्यांचे सोडून देता येईल. पण जे वाचतात, विचार करतात, चिकित्सा करतात, चळवळ करतात, परिवर्तनाची भाषा बोलतात, 'आम्ही सांस्कृतिक राजकारण करतो,' असा दावा करतात, प्रतिगाम्यांचा पाडाव करण्याच्या गर्जना करतात, भाषणात 'पर्याय देता आला पाहिजे,' अशी वाक्ये पेरतात, तेसुद्धा जेव्हा बुद्ध आणि त्याच्या धम्माकडे दुराव्याने पाहतात, तेव्हा गंमत तर वाटतेच, पण कीवही वाटते! आपल्याच देशातील आपल्यालाच मार्गदर्शक ठरलेल्या तेजस्वी विचारांना, त्या विचारांच्या संस्कृतीला आपणच 'आपले' मानत नाही, 'आपले' मानायला तयार होत नाही, 'आपले' न मानण्यासाठी हजार बहाणे/कारणे सांगतो, तेव्हा कीव करण्याशिवाय आणखी काय उरते? बुद्धिझमला टाळू पाहणाऱ्यांना एक विचारले पाहिजे. प्रतिगामी संस्कृतीला नेस्तनाबूत करण्यासाठी तुमच्याकडे कोणते सांस्कृतिक आयुध आहे? नुसती ढाल वापरून युद्ध जिंकता येत नाही! ढाल वापरून युद्धात पुढे सरकता येत नाही! पुढे सरसावण्यासाठी हातात तलवार असावी लागते! सांस्कृतिक लढाई करण्यासाठी तुमच्याकडे कोणती सांस्कृतिक मशिनरी आहे? भारतीय समाजमन जिंकून घेण्यासाठी, ते उन्नत करण्यासाठी तुमच्या हाताशी कोणती संस्कृती आहे? असे प्रश्न उपस्थित केले की एरव्ही 'बुद्धाकडे गेले पाहिजे', 'बुद्धाला टाळता येणार नाही', 'विचाराने मी बौद्धच आहे', अशा मोठमोठ्या गप्पा मारणारे चक्क गप्प बसतात. पण गप्प बसून कसे चालेल? 'बुद्धाकडे जाणे' या वाक्याचा खरा अर्थ प्रत्यक्ष कृतीतून कधी दिसेल? परंतु अशा प्रकारच्या कुठल्याच प्रश्नावर 'बुद्धाकडे जाऊ पाहणारे' काही बोलत नाहीत. असे का होते? कोण त्यांची जीभ अडवतो? कोण त्यांचा पाय खेचतो? कोण त्यांचे मन/त्यांचा मेंदू रोखतो?

हा 'कोण' कोण आहे? तो आहे, वैदिक धर्मसंस्कृतीने बुद्ध आणि त्याच्या धम्माबाबत घडविलेला भारतीय मनाचा चमत्कारिक पवित्रा! हा पवित्रा उघड शत्रुत्व दाखवत नाही. परंतु अंतरंगात परकेपणाची तीव्र भावना जोपासतो आणि मग बुद्ध/धम्म नाकारण्यासाठी ऑक्टोपससारखा अनेक तोंडांनी बोलत राहतो. उदाहरणार्थ...

पहिले तोंड :- सर्व धर्म सारखेच आहेत!
दुसरे तोंड :- सर्व धर्म वाईट आहेत!
तिसरे तोंड :- धर्माने जगात कुणाचेही भले झाले नाही!
चौथे तोंड :- धर्मापलीकडे गेले पाहिजे!

ही चारही वाक्ये कोणताही प्रतिगामी चुकूनही बोलत नाही. ती बोलतो पुरोगामी माणूस! त्यामुळे ती खरी वाटतात आणि लगेच पटतातही. पण त्यात मोठी गोम आहे. त्यात सध्या अस्तित्त्वात असलेली धार्मिक- सांस्कृतिक स्थिती 'आहे तशीच' कायम राहावी, हा बेमालूम डाव आहे. सध्या कोणती स्थिती अस्तित्वात आहे? डोळे नीट उघडून आजूबाजूला पाहिले तर आज जवळजवळ सर्व हिंदू समाज वैदिकांच्या आहारी गेला आहे हे स्पष्ट दिसेल. भारताच्या इतिहासात कधी नव्हे इतक्या मोठ्या प्रमाणावर आणि सार्वत्रिक स्वरूपात पहिल्यांदा असे घडले आहे. वीसतीस वर्षांपूर्वीपर्यंत दुर्गम भागातील वाड्यावस्त्यांवर वैदिक संस्कृती फारशी पोहोचली नव्हती. आता ती तिथपर्यंत पोहोचली असून विविध प्रकारच्या स्थानिक जीवनाचा तिने ताबा घेतला आहे. परिणामी देशभरची सांस्कृतिक विविधता जवळपास संपुष्टात आली आहे. आता सगळीकडेच वैदिक सांगतील ती कर्मकांड जोरात केली जात आहेत. झाडून सगळे स्वतःला हिंदू-वैदिक धर्माचा सदस्य मानू लागले आहेत. कुटुंबातली विवाहासारखी पवित्र समजली जाणारी कार्ये हटकून वैदिक पद्धतीने पार पाडली जाऊ लागली आहेत. अशा स्थितीत सगळे धर्म सारखेच आहेत किंवा वाईट आहेत, त्यामुळे त्याबद्दल जास्त विचार करू नका, त्याच्या फंदात पडू नका, धर्मापलीकडे जा, असे सांगणे म्हणजे समाजात सर्वदूर रूजत असलेल्या वैदिक धर्मसंस्कृतीकडे कानाडोळा करा, असे सांगण्यासारखे आहे. हे वैदिक धर्मसंस्कृती चिरस्थायी राहायला अप्रत्यक्षपणे मदत करण्यासारखे आहे. 'धर्मापलीकडे जाणे' हे बोलायला, ऐकायला, लिहायला भारी वाटले तरी त्याचा खरा अर्थ 'धर्माची फार चर्चा करू नका,' असा होतो. धर्माची जास्त चर्चा केली की माणसाची मजल धर्मांतराची चर्चा करण्यापर्यंत जाऊ शकते आणि मग त्याच्या मनात धर्मांतराचा विचार येऊ शकतो, हा संभाव्य धोका बेरकी उच्चवर्णीय पुरोगामी मंडळींनी फार पूर्वीच ओळखला आहे. थोडक्यात, 'धर्माच्या भानगडीत जास्त पडू नका' याचा अर्थ 'वैदिक धर्मसंस्कृतीच्या जोरदार वाटचालीला डिस्टर्ब करू नका,' असा आहे! धर्मापलीकडे फारसे कुणी जाणार नाही, बहुसंख्य लोक धर्मातच राहणार आहेत, याची 'धर्मापलीकडे गेले पाहिजे,' असे म्हणणाऱ्यांना पक्की खात्री असते. तरीदेखील मुद्दाम धर्मापलीकडे जाण्याचे आवाहन करण्यात येते. कारण त्यातून एकीकडे आपण पुरोगामी असल्याचेही सिद्ध होते आणि दुसरीकडे समाजमनावर असलेला वैदिक प्रभावही परस्पर 'जैसे थे' राहतो. उच्चवर्णीय पुरोगामी विचारवंतांचा धर्माविषयीचा हा पवित्रा आणि त्यांनी जाणीवपूर्वक सेट केलेली वेगवेगळी narratives सहजासहजी लक्षात येतीलच असे नाही. परिणामी, आज बहुसंख्य बहुजन नेते, कार्यकर्ते, विचारवंत अंधपणाने त्यांचीच 'री' ओढत असल्याचे चित्र दिसते. वैदिक धर्मसंस्कृती अबाधित ठेवण्याचा हा अतिशय चलाख 'पुरोगामी मार्ग' आहे, हे बहुतेकांच्या ध्यानात येत नाही! अर्थात, यावरून हेही सिद्ध होते की, बहुजन विचारवंत आणि नेते-कार्यकर्ते मूलगामी म्हणता येईल असा विचार करत नाहीत! 'निष्ठा' हा मुद्दा खूप महत्त्वाचा ठरतो, ही वस्तुस्थिती ते विचारात घेत नाहीत. या संदर्भात इथे एक उदाहरण घेऊ. आंबेडकर धर्मांतर करा असे म्हणाले आणि दाभोलकर धर्मांतर करा असे म्हणाले नाहीत. आता एक प्रयोग करून बघा. फुले, शाहू, आंबेडकर आम्ही सारे दाभोलकर, ही घोषणा देणाऱ्यांना धर्मांतर करण्याबद्दल विचारा. अंगावर पाल पडल्यासारखे ते तुमच्याकडे बघतील. याचा अर्थ काय? घोषणा देणारे भलेही आंबेडकरांचे नाव आवेशात घेतात, पण 'अंतिम प्रमाण' दाभोलकरांना मानतात! तुम्ही कुणाची स्तुती करता, तारस्वरात कुणाच्या घोषणा देता, हे महत्त्वाचे ठरत नाही, तर कळीच्या मुद्द्यावर तुम्ही कुणाला प्रमाण मानता, हे निर्णायक आणि फायनल ठरते! बारकाईने पाहिले तर हे दिसेल की, एखाददुसरा अपवाद वगळता यच्चयावत सगळे पुरोगामी आंबेडकरांच्या धर्मांतराच्या विरुद्ध भूमिकेत आहेत! ते धर्मांतराला विरोध करण्यासाठी वर उल्लेख केलेली narratives प्रसंगानुरूप आणि खुबीने वापरतात. ती वापरून इकडे बौद्ध धम्माच्या स्वीकाराचा/विस्ताराचा मार्ग बंद केला जातो आणि तिकडे वैदिक धर्मसंस्कृती सुखनैव नांदू / विस्तारू दिली जाते!

सीटीबीटी नावाचा एक आंतरराष्ट्रीय करार आहे. त्यानुसार अमेरिका स्वतः सर्व प्रकारच्या अणुचाचण्या बिनधास्त करू शकते. इतरांनी मात्र त्या करायच्या नाहीत. इतरांनी केल्या की पर्यावरणावर परिणाम होतो. अमेरिकेने केल्या तर पर्यावरणावर परिणाम होत नाही! आपले पुरोगामी धर्माच्या बाबतीत साधारण अशा प्रकारची भूमिका घेत असतात. विषमतावादी, अंधश्रद्धावादी, कर्मकांडवादी, शोषणवादी वैदिक धर्मसंस्कृती 'आपण सारे हिंदू' नावाचे मायावी जाळे फेकून सगळ्यांना आपल्या पंखाखाली घेत आहे हे त्यांना माहीत असते. अशा वेळी खऱ्या पुरोगाम्यांनी काय केले पाहिजे? उघडच आहे की, ते जाळे फाडून टाकायचे प्रयत्न केले पाहिजेत. 'आम्ही हिंदू नाही,' असे खडसावले पाहिजे. देशभरातल्या सगळ्या लेण्यांमध्ये आणि मंदिरांमध्ये विराजमान असलेल्या मात्र आता विपर्यास करून ठेवलेल्या मूळ बुद्धाचे आणि त्याच्या धम्माचे आम्ही वारसदार आहोत, हे अभिमानाने सांगितले पाहिजे. पण ते राहिले बाजूलाच, 'आता कुणी 'धर्म' या विषयावर काही करू नका. त्याच्या खोलात जाऊ नका. धर्मापलीकडे जा. धर्म महत्त्वाचा नसल्यामुळे धर्मांतर वगैरे गोष्टी अनावश्यक आहेत,' अशा प्रकारचे काहीतरी ते सांगत-लिहीत राहतात! धर्मांतर/बौद्धधम्मस्वीकार हा विषय घेऊन ज्या ज्या वेळी एखादी चळवळ उसळी मारून वर येते, नेमके त्याच वेळी पुरोगामी गोटातून 'धर्माने आजपर्यंत कुणाचे भले झाले आहे?' हे वरवर काळजी केल्यासारखे वाटणारे परंतु प्रत्यक्षात कावेबाज असलेले प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येते! पुरोगामी कंपूची ही भूमिका सीटीबीटी करारातल्या अमेरिकेसारखीच दांभिक म्हणावी लागेल! चांगल्या मार्गाने मानवी समाज विकसित करण्याचे दोनच मंत्र आहेत. एक - अत्त दीप भव, आणि दोन - भवतु सब्ब मंगलम! हे दोन्ही मंत्र स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय आणि बुद्धिप्रामाण्य या संविधानिक मूल्यांच्या प्रस्थापनेला सर्वार्थाने पोषक-पूरक-प्रेरणादायी आहेत. एवढेच नव्हे, ते माणसाचे 'माणूस' म्हणून उत्थान करणारे आहेत! 'अत्त दीप भव' द्वारे स्वतःचे, तर 'भवतु सब्ब मंगलम' द्वारे भवतालाचे! याच द्रष्ट्या भूमिकेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धम्मचक्रप्रवर्तन केले होते. आज भारतीय समाजाला त्याचीच सर्वाधिक गरज आहे. ■ ■

– संदीप सारंग

## शिक्षकाचा नाद करायचा नाही...

वर्गात प्राध्यापकांनी मानसशास्त्राचा तास घ्यायला सुरुवात केली होती. तेवढ्यात मागून एका मुलाने शिट्टी वाजवली. प्राध्यापकांनी शिट्टी कोणी वाजवली असे विचारल्यावर संपूर्ण वर्ग शांत बसला मात्र कोणीच नाव सांगितले नाही. सरांनी हातातला खडू खाली ठेवलाआणि म्हणाले, 'आपला आजचा तास इथेच संपतो आहे, पण राहिलेला वेळ सार्थकी लावण्यासाठी मी तुम्हाला कालच रात्री घडलेला एक किस्सा सांगतो...! 'किस्सा ऐकण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी कान टवकारले.' काल रात्री उशिरापर्यंत मला झोप येत नव्हती. वेळ काढायचा म्हणून गाडीत पेट्रोल भरून येऊ असा विचार माझ्या मनात आला म्हणून गाडी काढून मी पेट्रोल भरून घेतले. पेट्रोल भरल्यावर सहजच मी एका शांत रस्त्यावर गाडी वळवली. रस्त्याच्या कोपऱ्यावर एक अतिशय सुंदर मुलगी उभी होती. मी गाडी तिच्याजवळ थांबवून तिला विचारले : 'मॅडम, मी आपली काही मदत करू शकतो का...?' 'हो, मला घरापर्यंत सोडू शकलात तर फार बरं होईल...!' गाडीचा दरवाजा उघडून मी तिला आत घेतले, आणि तिच्या घराच्या दिशेने गाडी वळवली. वाटेत आम्ही विविध विषयांवर चर्चा करत होतो. सौन्दर्यासोबतच बुद्धिमत्तेची देणगी लाभलेल्या निवडक स्त्रियांमध्ये मी तिचा समावेश करेन... तिच्या घराशी पोहचल्यावर तिने लाजत लाजत कबूल केले की माझ्या सहृदय वागण्यामुळे ती माझ्या प्रेमात पडली आहे. मी ही तिच्या सौन्दर्याची आणि बुद्धिमत्तेची तारीफ करत तिच्या प्रेमात पडल्याची कबुली तिला दिली. एकमेकांशी बोलताना मी तिला माझ्या पेशाबद्दल सांगितले. निरोप घेताना आम्ही फोन नंबरची अदलाबदल केली. अगदी शेवटच्या क्षणी तिने मला सांगितले की तिचा भाऊ मी शिकवत असलेल्याच महाविद्यालयात शिकतो, त्यामुळे होणारा दाजी या नात्याने मी त्याची काळजी घ्यावी. मी तिला त्याचे नाव विचारले त्यावर तिने उत्तर दिले की तुम्ही त्याला त्याच्या खास सवयीवरून लगेच ओळखाल. 'तो अतिशय उत्तम शिट्टी वाजवतो' प्राध्यापकांच्या या वाक्यावर अख्खा वर्ग मगाशी शिट्टी वाजवलेल्या विद्यार्थ्याकडे बघायला लागला. प्राध्यापक महाशय त्या विद्यार्थ्याकडे बघून हसून म्हणाले: 'माझी मानसशास्त्राची पदवी व ज्ञान मी विकत घेतलेले नाही तर स्वकष्टाने प्राप्त केले आहे. निघ बाहेर वर्गाच्या...! वाचण्यात आलेला सुंदर लेख. ■ ■






सागर रामभाऊ तायडे
9920403859

## विकास म्हणजे नेमके काय ?




मनाचा म्हणजे बुद्धीचा विकास झाला नाहीतर झालेला भौतिक विकास हा आध्यात्मिकतेच्या नावावर जीवांची आहुती मागतो व हे काम नाणे म्हणजे अर्थात भांडवल जोमात करते. नाणे मुळात अस्त्रच असते जे शस्त्रांना उचकविते. भांडवल नेमके हेच करते म्हणून जगात भांडणे आहेत. या भांडण्याचे वर्णन म्हणजे लालित्य जे मानवांना उद्दित करतात.. म्हणून कोणत्याही प्रकारच्या लालित्यापासून मुक्त असणे म्हणजे स्वातंत्र्य. 'कितने आदमी थे?' या वाक्याच्या लालित्यात अडकले कि "To be or not to be" अशी अवस्था झाली म्हणूनच समजा. कारण नाणे आले कि अगोदर लालित्याचे गाणे येते व ते संगीताच्या संगतीने आणि नाट्य, नृत्य अथवा क्रिडा इत्यादिच्या लालित्त्यात्मक मानसिकतेने द्वेषाचे रोपण करते. सत्ता ही कर/महसुलांच्या नावावर जबरीने, कायद्याने नाणे म्हणजे भांडवल जमविते व भांडणांना वाट मोकळी करून देते. धर्म सुद्धा दक्षिणा, दान, देणगी व वर्गणीच्या नावावर ऐच्छिक स्वरूपात नीधी म्हणजे महसुलच वसूल करते. हे काम विविध धर्माचे पुरोहित करतात. तसेच पुरोहित लोक सत्तेत शिरून महसुलही वसूल करून त्यावर कब्जा करतात. ते वसुलीचे काम करतात म्हणून ते 'हा आमचा वसुल आहे' असे उजागिरीने सांगतात. हे झाकण्यासाठी लालित्याच्या पडद्याआड मनोरंजनाचे पेव पेरतात व या मनोरंजनी लालित्यपूर्ण प्रवचन, किर्तन व तत्सम लालित्यात ते व्यक्ती व व्यक्तीसमुहांना गुलामीच्या मानसिकतेत ढकलून गुरफटवून टाकतात. यासाठी भाषा आणि भाषाविज्ञान हे महत्वाची भुमिका बजावतात. भाषेच्या कैदेत अडकविणे म्हणजेच व्याकरण जे मुळात राजकारण, कुटनीती असते. भाषा म्हणजे मानवाला वाचा नसती तर मानव कासव असता, जो ताठ कण्याने शांतपणे जगला असता या धरतीवर. यामुळे मानवाची अवस्था ही 'करा गेले काय? झाले उलटे पाय' अशी या भाषिक विवादाने झालेली आहे. तो स्वतःही सरत आहे व धरतीलाही संपवित आहे. संपविणे म्हणजे जगणे ही मानवी प्रवृत्ती झाली आहे. युद्ध हे याचे माध्यम आहे. म्हणून प्रश्न पडला 'विकास म्हणजे नेमके काय?' ■ ■



विनोद उलीपवार
मो.9370138078

## 'जय भीम' चरणी...

**'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या क्रांतिकारी विचारांचे मार्गदर्शक भीम! आणि त्यांचा 'जयजयकार' असो; हा आपल्या मुख मंडलातून पडणारा शब्द किती शुद्ध, निर्मळ आणि पवित्र आहे याची कल्पना हृदयी वसू द्या.**

समाजात वावरताना ओळखीची व्यक्ती भेटल्यानंतर आपल्या मुखातून बाहेर पडणारा शब्द म्हणजे जय भीम! 'जय भीम' या शब्दामागे काही कर्तव्यकर्म आहेत. या मंत्रामुळे महान शक्तीची उपासना आणि स्मृती करणे होय. जयभीम या शब्दात क्रांतीची महान शक्ती सामावली आहे. मृतवत पडलेल्या मानव समाजाला जागृतीचा प्रकाश देणारा आहे. आट सामर्थ्य व पोलादी संघटना आहे. 'अज्ञान नष्ट करून हळुवारपणे ज्ञान विहाराकडे जा...' असा संदेश आहे. या शब्दाच्या उच्चारामुळे स्वाभिमानी वृत्ती आपल्यात निर्माण होते. फेकलेल्या तुकड्यावर न जगता स्वतःच्या पायावर उभे राहून सर्व काही संपादन करता येते असे सामर्थ्य आहे. या शब्दात आशावादी जीवन जगण्याचे किरण आहे. 'जय भीम' ही शक्ती अन्यायाविरुद्ध झगडण्याचे प्रभावी साधन आहे. डॉ. बाबासाहेबांच्या धम्मदीक्षेने हाच संदेश जगाला दिला आहे. धम्मदीक्षेने 'जय भीम'ची ऊर्जा दिली आहे. 'जय भीम' हा बुद्धांच्या शासनातील आधुनिक क्रांतीचा नारा आहे. नवनिर्माण करण्याची प्रेरणा आहे. 'जय भीम' बुद्धाची करुणा आहे. प्रज्ञेचा अलंकार आहे. डॉ. बाबासाहेबांनी सांगितलेच आहे की, बुद्ध धम्मानेच जगाचा उद्धार होणार आहे. धम्मदीक्षेने ही क्रांती घडवून आणली आहे. डॉ. बाबासाहेबांची धम्मदीक्षा ही सामाजिक परिवर्तनाची दिशा ठरली आहे.

'जय भीम' हा शब्द उच्चारताच मनात विचार जागृती निर्माण होऊन मला काही तरी करावयाचे आहे व ते आधी केलेच पाहिजे याचे दिग्दर्शन झालेले आहे. 'गुलामाला गुलामगिरीची जाणीव करून देवून लादलेल्या अत्याचाराविरुद्ध प्राणपणाने झगडा' याचे मार्गदर्शन केलेले आहे. या शब्दात अस्पृश्यांच्या स्वातंत्र्याचा उषःकाल सामावलेला आहे. ज्या ठिकाणी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून श्रेष्ठत्व पद प्राप्त करण्याच्या आधारावर माणुसकीचा निलध्वज उभारावयाचा आहे. त्या ध्वजाच्या सुरेख सावलीखाली प्रेम-समता-बंधुता-न्याय आणि शीलाचे अमृततुल्य सरोवर निर्माण करावयाचे आहे. एवढे पावित्र्य या शब्दात ओतप्रोत भरले आहे! तरीपण आंबेडकरी समाजात काही अपवाद वगळता सुशिक्षित वर्ग या शब्दाचा उच्चार करण्यास मागेपुढे पाहतो!! हीच कां आमची परंपरा? ती कायम राहिली तर आम्ही घोर अकुशल कर्म करीत आहोत असे वाटते. आम्ही स्वतःची फार मोठी हानी करीत असून जीवनाला आणखी शरणागतीच्या मार्गाकडे नेत आहोत असे म्हटल्यास वावगे होणार नाही. धम्मबंधूंनो, खरेच तुम्ही 'जय भीम' शब्द उच्चारा. तुम्हाला स्फूर्ती मिळेल. आपुलकी वाटेल. भारत देश हा माझा आहे. त्यावर उद्भवलेली संकटे, सुखदुःखे ही माझीच आहेत असा भास होतो. तिरस्काराची भावना या शब्दामुळे लयाला गेली आहे. खोटे बोलण्याचे धाडस राहात नाही. सत्य ते सत्यच सिद्ध करण्यासाठी माझे प्राण जरी गेले तरी पर्वा नाही. याची जाणीव हृदयात सदैव तेवत राहते. जय भीमच्या सामर्थ्याने जेथे अन्याय-अत्याचार किंवा आक्रमण असेल तेथे न्याय, शांती व स्वातंत्र्य झाल्याशिवाय राहात नाही. कोणतीही गोष्ट प्राप्त करून घ्यावयाची असेल तर त्यासाठी संघर्ष... संघर्ष... संघर्ष... हा करावाच लागतो. झगडा, आणखी त्याग करा. त्यागाची व हालाची पर्वा न करता एकसारखा झगडा चालू ठेवाल तरच तुम्हाला मुक्ती मिळेल. आपले कार्य पवित्र आहे यावर दृढ विश्वास ठेवला पाहिजे. आपल्यावर लादली गेलेली गुलामगिरी नष्ट करण्यासाठी आपले तन-मन-धनाने तारुण्य कुर्बान केले पाहिजे. बीया-वाईटाची, सुख-दुःखाची, वादळाची, मान-अपमान याची पर्वा न करता मानव एकसारखे झगडत राहतील तरच आपला उद्धार होईल. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या महान क्रांतिकारी विचारांचे मार्गदर्शक भीम! आणि त्यांचा 'जयजयकार' असो; हा आपल्या मुख मंडलातून पडणारा शब्द किती शुद्ध, निर्मळ, पवित्र आहे याची कल्पना हृदयी असू द्या. 'जय भीम' शब्द उच्चारण्यामागे हाच उदात्त हेतू आहे. मुक्तिदात्याचा जयघोष करणारा 'जय भीम' नारा आज शोषित, पीडित, दीनदुबळ्यांचा श्वास बनला आहे. 'जय भीम' या शब्दात राष्ट्रव्यापी दृष्टिकोन, स्वातंत्र्याची प्रेरणा, माणुसकीचे किरण, आईची ममता, निरंजना नदीची निर्मळता, सूर्याची प्रखरता, चंद्राची शीतलता, वीर स्वाभिमानी वृत्ती, कणखर बाणेदारपणा, धम्मनिष्ठ करुणेचा जलाशय, हिमालयाची उत्तुंगता, कर्तव्याची पराकाष्ठा, दलित-पीडित-शोषित मानवतेचा रक्षक, ज्ञानाचा सागर एकजीव झाला आहे आणि त्यापासून मानवांना मार्गदर्शन मिळत असल्यामुळे त्या महान शक्तीचा जयजयकार करणे योग्य नाही असे कोण म्हणू शकेल! जनी-मनी-स्थळी 'जय भीम' मंत्राचा उद्घोष करावयास पाहिजे. असा हा क्रांतिकारी 'जय भीम' उच्चारण्याची प्रथा डॉ. बाबासाहेबांचे एकनिष्ठ अनुयायी नागपूरचे बाबू एल. एन. हरदास यांनी सुरू केली. 6 जानेवारी 1935 रोजी त्यांनी 'जय भीम'ची मुहूर्तमेढ रोवली. नव्वद वर्षानंतरही मोठ्या आदराने मानाचा 'जय भीम' केला जातो. ■ ■






मिलिंद मानकर
मो. 8177866397

## दीक्षाभूमी आराखडा जागतिकस्तरीय, ऐतिहासिक, सांस्कृतिक व नाविन्यपूर्ण

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्याठिकाणी बौद्ध धम्माची दीक्षा दिली ती दिक्षाभूमी आपली सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक धरोहर आहे. तिचे संरक्षण करणे हे आपले प्रथम कर्तव्य आहे. संकल्पित विकास आराखड्यात बुद्धधम्माचा आत्मा परावर्तित व्हावा आणि बौद्ध संस्कृतीचे दर्शन प्रत्येक टप्प्यावर व्हावे, अशी रचना असावी.अ) दिक्षाभूमीचा विकास आराखडा दिक्षाभूमीचा विकास आराखडा देशातील प्रसिद्ध बौद्ध वास्तु विशारदांकडून तयार करण्यात यावा. संपूर्ण रचना ही एकत्रित (Integrated) स्वरूपाची असावी. संकल्पित रचनेतील प्रत्येक बांधकाम हे बौद्ध संस्कृतीचे प्रतीक आणि त्याची साक्ष देणारे असावे. ब) अभियांत्रिकी उपाययोजना दिक्षाभूमीवरील स्तूपाचे बांधकाम 1975 नंतर करण्यात आले. त्या काळातील परिसराच्या परिस्थितीनुसार रचना केली होती. आज त्याला 50 वर्षे उलटली असून परिसरात मोठे बदल झाले आहेत. चारही बाजूंचे रस्ते काँक्रीटचे झाले असून ते उंचावले आहेत. परिणामी दिक्षाभूमीचा परिसर खोलगट झाला आहे, ज्यामुळे पाणी साचते आणि स्तूपालाही त्याचा त्रास होतो. म्हणून संपूर्ण परिसराचा कंटूर सर्व्हे करून आवश्यकतेनुसार भराव करावा आणि नैसर्गिक उतार ठेवून पाण्याचा निचरा सुलभ करावा. पाण्याचा साठा होऊ नये म्हणून एकत्रित ड्रेनेज आराखडा तयार करावा. विजयादशमीच्या वेळी उपासक तीनही दिशांनी दिक्षाभूमीत प्रवेश करतात. त्यामुळे बौद्ध वास्तुविशारदांच्या सल्ल्यानुसार प्रवेशद्वारे निश्चित करावीत. आपत्कालीन परिस्थितीत सुलभ निर्गमनासाठी (Exit) रुंद आणि अधिक गेट्सचे नियोजन करावे. क) बौद्ध धम्म प्रतीकांचे संरक्षणस्तूपः स्तूपाला लागून कोणतीही कामे करता कामा नयेत. त्यामुळे त्याचे स्वरूप झाकले जाईल आणि महत्त्व कमी होईल. स्तूप व पायव्या यांचे तांत्रिक परीक्षण करून आयुष्य वाढवण्यासाठी आवश्यक उपाय करावेत. बोधिवृक्षः वातावरणातील बदलांचा परिणाम बोधिवृक्षावर होतो. तो निरोगी आणि दीर्घकाळ टिकावा म्हणून तज्ज्ञ संस्थेकडून वैज्ञानिक मार्गदर्शन घेऊन त्याचे संवर्धन करावे. ड) ऐतिहासिक रचना (Historical Creation) 1956 मध्ये डॉ. बाबासाहेबांनी दिलेली बौद्ध दीक्षा ही जागतिक दृष्ट्या ऐतिहासिक घटना आहे. तिची स्मृती जपण्यासाठी नियोजित रचना असावी. कलादालन (Museum) : हे प्रत्यक्ष पुरातत्त्व विभागाच्या (ASI) सल्ल्याने तयार करावे. डॉ. बाबासाहेबांच्या विद्यार्थीदशेतून ते 1956 पर्यंतच्या प्रवासाचे म्युरल्स व उपशीर्षकांसह प्रदर्शन असावे. सम्राट अशोक, भदंत नागार्जुन, अनागरिक धम्मपाल, आनंद कौसल्यान यांचे पुतळे आणि त्यांच्या योगदानाची माहिती द्यावी. बौद्ध स्थळांच्या प्रतिकृती (कपिलवस्तू, सांची, नालंदा, राजगीर, कुशीनगर, बोधगया) योग्य ठिकाणी मांडाव्यात. डॉ. बाबासाहेबांचे जन्मस्थान महू, राजगृह, दिल्लीतील निवासस्थान आणि चैत्यभूमी यांच्या प्रतिकृतींचा समावेश असावा. आधुनिक काळातील बौद्ध पवित्र स्थळांचा (उदा. हुसेन सागर, ध्यान बुद्धा) समावेश करावा. संग्रहालयाच्या प्रवेशद्वारासमोर भव्य अशोक स्तंभ आणि अशोकचक्र उभारण्यात यावे. सांस्कृतिक रचना (Cultural Creation)धम्मसभागृह – डॉ. बाबासाहेबांच्या अपेक्षेनुसार उपासकांनी विहारात जाण्याची परंपरा वाढावी यासाठी दिक्षाभूमीवर मध्यम आकाराचे धम्मसभागृह असावे. प्रत्येक रविवारी आणि पौर्णिमेला प्रशिक्षित आचार्यांद्वारे धम्मदेशना आयोजित करावी. इतर दिवशी हे सभागृह धम्मप्रसारक संस्थांना कार्यासाठी उपलब्ध असावे. ज्ञान केंद्र (Knowledge Center) ई-लायब्ररी – आधुनिक ई-लायब्ररीमध्ये डॉ. बाबासाहेबांची पुस्तके, भाषणे, संविधानावरील चर्चा, बुद्ध तत्त्वज्ञानावरील ग्रंथ, आणि पुरोगामी साहित्य डिजिटल स्वरूपात उपलब्ध करावे. विद्यार्थी संगणकावरच वाचन करू शकतील अशी व्यवस्था असावी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर थॉट्स, बौद्ध अभ्यास आणि मान्यताप्राप्त पाली भाषा अभ्यासकेंद्रांची स्थापना करावी. जागतिक स्तरावरील व्यवस्थाबौद्ध धम्माचा प्रसार जागतिक स्तरावर व्हावा म्हणून आंतरराष्ट्रीय बौद्ध परिषदा आणि बौद्ध राष्ट्रांच्या प्रतिनिधींच्या संमेलने आयोजित करण्यासाठी योग्य अधोसंरचना असावी. पूर्वनियोजित सभामंचाशी ते एकत्रित केल्यास जागा व खर्च वाचेल. जागेचे नियोजनवरील प्रस्तावित कामांसाठी विद्यमान जागेचा उपयोग प्राधान्याने करता येईल. मात्र विजयादशमीसारख्या प्रसंगी येणाऱ्या उपासकांच्या सुविधेसाठी आणि भविष्यातील योजनेसाठी अतिरिक्त जागा संपादित करणे आवश्यक आहे. प्रकल्पाची किंमतअति भव्य किंवा बौद्ध संस्कृतीशी विसंगत बांधकामे वगळल्यास बचतीतून ही सर्व कामे करता येतील. प्रकल्पाच्या देखभालीचा खर्च कमी करण्यासाठी 'ग्रीन बिल्डिंग' संकल्पना वापरावी. दिक्षाभूमीचा आराखडा सर्वमान्य आणि सुयोग्य बनवणे हे एक आव्हान आहे. आपल्या सक्षम अभियंत्यांनी सामाजिक दायित्व म्हणून या कार्यासाठी मार्गदर्शन आणि वेळ द्यावी. ■ ■






इंजि. नरेंद्र ताकसांडे
मो.9422922668

# संथागार गोंदिया येथे 'चरणस्पर्श -एक कर्मगाथा' पुस्तकाचे प्रकाशन




## 23 एकर चंद्रमणी नगर नागपूर परिसरात बाबासाहेब आंबेडकर यांचा एकमेव पुतळा

1975 ला पुतळ्याकरिता संतोष खांडेकर यांनी जागा दान दिली असून 1977 ला पुतळा स्थापित करण्यात आला. जगविख्यात बौद्ध विचारवंत डॉ. भदंत आनंद, कौशल्यायन यांनी उद्घाटन केले आहे. स्मृतीशेष माजी नगरसेवक किशोर गजभिये यांनी सौंदर्यकरण केले. राजकीय पक्षांचे मोठे नेते यांनी या पुतळ्याला अभिवादन करून जाहीर सभा घेतात. सर्व कार्यक्रम या परिसरात होतात.

संवाद मित्र, डी.आर. कांबळे
8600924170




### आंबेडकरी कार्यकर्ते 'स्मृ.शे.चरणदासजी कठाणे यांचे' जन्मशताब्दी वर्ष व स्मृती दिन

**नागपूर :** बुद्धीष्ट समाज संघ संथागार गोंदिया संचालीत संथागार या विस्तीर्ण बुद्ध विहारामधे येथील संडे असेंब्ली या उपक्रमांतर्गत स्मृतशे षचरणदासजी कठाणे यांच्या जन्म शताब्दी वर्ष 2025 च्या अनुषंगाने त्यांचा स्मृती दिन कठाणे परीवार, संलग्न परीवार, संथागार परीवार व मित्र परीवार तर्फे स्नेह मिलन व प्रबोधन कार्यक्रम मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

याप्रसंगी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते त्यांच्या जिवनावर आधारित त्यांचे सुपुत्र इंजी. अविनाश कठाणे द्वारा लिखीत पुस्तक 'चरणस्पर्श -एक कर्मगाथा' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा. डॉ. निरज बोधी विभाग प्रमुख पाली-प्राक्रुत व बुद्धीष्ट स्टडीज रा.तु.म. विद्यापीठ नागपूर, प्रमुख वक्ते ॲड. सचिन मेकाले युवा आंबेडकरी विचारवंत, अरविंद गेडाम अध्यक्ष बानाई, बबन चहांदे जेष्ठ साहित्यिक व आंबेडकरी विचारवंत, आशीष फूलझेले सचिव मानव संसाधन संरक्षण मंच, ईश्वर कडबे प्रभारी राष्ट्रीय बौध्द महासंघ नागपूर, प्रा. रोशन मडामे व्यवस्थापक संथागार गोंदिया व विनायक हाडके अध्यक्ष ब्ल्यू क्लब सोशल फोरम नागपूर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. समता सैनिक दल परेड नंतर प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. नीरज बोधी हस्ते ध्वजारोहण करून विहारात आदर्शांच्या प्रतिमांना पुष्पार्पण, दीप प्रज्वलन करून वंदना घेतली. उपस्थित पाहुण्यांचे स्वागत पंचशील ध्वजवस्त्र,पुष्प व स्मृती चिन्ह देऊन केलं .त्यानंतर प्रबोधन सत्राात प्रमुख वक्ते ॲड. सचिन मेकाले म्हणाले की रामजी आंबेडकर यांच्या सुयोग्य संस्काराने व मार्गदर्शनाने बाबासाहेब आंबेडकर घडले व त्याच प्रकारे स्मृ.शे. चरणदास कठाणे यांनी स्वतः अल्पशिक्षित असून सुध्दा आपल्या मुलामुलींना शैक्षणिक मार्गदर्शनाने घडवले.अरविंद गेडाम गोंदिया पुत्र असल्यामुळे त्यांनी कठाणे परीवाराशी जवळीकीबद्दल व आपल्या लोकांची परिस्थिती त्याकाळी कशी हलाकीची होती व बिड्या बांधत मजुरी करून आपले लोक शिक्षित होत कसे प्रगत झाले हे व्यतीत केले. आशिष फुलझेले यांनी आपल्या पुर्वजांच्या मेहनती मुळे व बाबासाहेबांच्या आधुनिक व वैज्ञानिक दृष्टीकोनात्मक विचारांनी आपण या चांगल्या अवस्थेत आहोत हे सांगितले. बबन चहांदे, ईश्वर कडबे व विनायक हाडके यांनी चरणदास बाबाजींच्या कष्टामुळे व त्यांनी अवलंबविलेल्या बुद्धांच्या, बाबासाहेबांच्या विचारांचा आदर्श घेऊन कठाणे परीवार प्रगत झाला हे नमूद केले. प्रा. रोशन मडामे यांनी कठाणे परीवाराचे या कार्यक्रमाच्या योग्य नियोजना बंद्दल अभिनंदन करीत या संथागार मधे होऊ घातलेल्या रूम बांधकामा साठी कठाणे बंधू तर्फे एक लाखाचे धम्म दान देण्याबद्दल धन्यवाद दिले व संथागार परिवार येधील उपक्रम यशस्वीपणे कसे राबवित आहे याबद्दल सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमाचे संचालन डॉ. विकास कठाणे सावंतवाडी यांनी, प्रास्ताविक या कार्यक्र माचे प्रमुख आयोजक अभियंता अविनाश कठाणे यांनी भावनिक रित्या प्रस्तूत केले व आभार प्रदर्शन कठाणे परिवारातर्फे ब्ल्यू क्लब सोशल? फोरमचे राजेश हाडके यांनी केले. कार्यक्रमाला विशेष सहकार्य दिल्याबद्दल काही व्यक्तींचे तसेच कठाणे व संलग्न परीवारातील प्रतिनिधिंचे पुष्प, पुस्तक, पंचशील ध्वजवस्त्र व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. तसेच बहुजन सौरभच्या विशेष अंकाचे वितरण सर्व उपस्थित लोकांमध्ये केला. या कार्यक्रमात भिलाई, पुणे, भंडारा, नागपूर व गोंदिया जिल्ह्यातील कठाणे परिवारजन, मित्र परीवारजन व उपासक उपासिका बहुसंख्येने आवर्जून उपस्थित होते.

### महाज्योती नागपूर आणि नागपूर सुधार प्रन्यास या संस्थांवर होती भूमिपूजनाची जबाबदारी

## महाज्योती इमारतीच्या भूमिपूजनावरून सामाजिक संघटनांचा आक्षेप

#### धार्मिकऐवजी वैज्ञानिक दृष्टिकोन जपण्याची मागणी

**नागपूर :** महात्मा जोतीराव फुले यांच्या नावाने स्थापन झालेल्या महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) च्या नवीन इमारतीच्या भूमिपूजन समारंभात वेदोक्त मंत्रोच्चार वापरल्याबद्दल विविध सामाजिक संघटनांनी तीव्र आक्षेप नोंदवला असून, या घटनेचा तीव्र निषेध केला आहे.



यासंदर्भात सामाजिक संघटनांनी राज्याचे मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांना एक निवेदन सादर केले आहे. या निवेदनात त्यांनी नमूद केले आहे की, शैक्षणिक व सामाजिक संस्था स्थापन करण्यामागे शासनाचा मुख्य उद्देश विद्यार्थी व नागरिकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवतावाद वृद्धिंगत करणे हा असतो. परंतु, महाज्योतीच्या नवीन इमारतीचे भूमिपूजन वेदोक्त मंत्रोच्चाराने करण्यात आले, जे महात्मा फुले यांच्या अनिष्ट धार्मिक रूढी, परंपरा आणि कर्मकांडाच्या विरोधातील जीवनकार्याला आणि संविधानातील 51(H) अनुच्छेदानुसार अपेक्षित असलेल्या विज्ञानवादी दृष्टिकोन, मानवतावाद, संशोधक वृत्ती व चिकित्सक बुद्धी च्या विकासाला तडा देणारे आहे.

संघटनांच्या मते, राज्याला कोणताही धर्म नाही, ते धर्मनिरपेक्ष आहे आणि या तत्वाला सुप्रीम कोर्टाने वेळोवेळी दुजोरा दिला आहे. मंत्रीपदाची शपथ घेताना संविधानाचे पालन करण्याची शपथ घेतल्यानंतर, एका विशिष्ट धर्माच्या पद्धतीनुसार भूमिपूजन करणे आणि या कार्यक्रमात मा. मुख्यमंत्री, मा. महसूल मंत्री तसेच प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी यांनी सहभागी होणे हा महात्मा जोतीराव फुले आणि भारतीय संविधानाचा अपमान आहे. *सर्व सामाजिक संघटनांची मुख्य मागणी आहे की, सदर इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर तिचे उद्घाटन कोणत्याही धार्मिक पद्धतीने होऊ नये. जर या घटनेची पुनरावृत्ती झाल्यास सर्व सामाजिक संघटना तीव्र स्वरूपात विरोध करतील, असा इशाराही त्यांनी दिला आहे. सामाजिक संघटनांनी आशा व्यक्त केली आहे की, यापुढे शासनाकडून अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही.* या निवेदनाच्या प्रती सभापती, नागपूर सुधार प्रन्यास; व्यवस्थापकीय संचालक, महाज्योती नागपूर; आणि जिल्हाधिकारी, नागपूर यांना देखील पाठवण्यात आल्या आहेत. निवेदन देण्यासाठी, बहुजन संघर्ष समिती, ओबीसी युवा अधिकार मंच, मराठा सेवा संघ, जिजाऊ ब्रिगेड, संभाजी ब्रिगेड, राष्ट्रीय मुस्लिम बहुजन परिषद, बानाई नागपूर, फेडरेशन फॉर सोशल जस्टीस, सेक्युलरिझम आणि डेमोक्रेसी, सत्यशोधक समाज, कर्पूरी ठाकूर विचार मंच, अ.भा. अंधश्रद्धा निर्मूलन समिती, शिक्षा बचाव समन्वय समिती, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, रिपब्लिकन फेडरेशन, समता सैनिक दल, आणि विविध संघटनांचे पदाधिकारी यांचा सहभाग होता. यामध्ये प्रामुख्याने जेष्ठ सत्यशोधक बहुजन विचारवंत नागेश चौधरी, प्रा. जावेद शेख, प्रदीप नगरारे, त्रिलोक हजारे, हरीश देशमुख, होमेश भुजाडे, जगजितसिंग, उमेश कोर्राम, राम काळे, डॉ. संजय शेंडे, दिलीप खोडके, मिलिंद पखाले, स्वाती शेंडे, अनिता ठेंगरे, नंदा देशमुख, प्रमोद वैद्य, जया देशमुख, प्रताप पटले ,सुधांशू मोहोड, अजय यावलकर, बाबा बीडकर,, प्रदीप शेंडे, किशोर खांडेकर, नब्बु शेख, महेंद्र गांजरे, नरेश खडसे, रामभाऊ डोंगरे , पियुष आकरे, शुभम तिखट, सुहास अंबादे, सुनील सारीपुत्त, रामभाऊ डोंगरे, सुशील मेश्राम आदी उपस्थित होते.



## थिबा राजा कालीन बुद्ध विहार संघर्ष समितीचा ऐतिहासिक मोर्चा यशस्वी

**रत्नागिरी :** रत्नागिरी येथील थिबा राजा कालीन बुद्ध विहारासाठी आरक्षित साडे सतरा गुंठे जागेवर बुद्धविहाराऐवजी कम्युनिटी हॉल (समाजमंदिर) बांधण्याच्या नगरपरिषदेच्या प्रस्तावाचा निषेध करत बौद्ध समाजाने जोरदार मोर्चा काढला. या मोर्चाचे आयोजन थिबा राजा कालीन बुद्ध विहार संघर्ष समिती तर्फे करण्यात आले होते. अध्यक्ष विजय पालकर, उपाध्यक्ष संतोष गायकवाड, सचिव प्रमोद बागल, तसेच कार्याध्यक्ष प्रा. अनिल कदम, अजय वायंगणकर, मंगला पवार, सुनंदा साळवी, दिलीप बागल, प्रशांत पवार, रमेश जाधव आदी पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली हा ऐतिहासिक मोर्चा पार पडला.

मोर्चाला समाजातील तरुण, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विरोधकांच्या अफवा व राजकीय दबाव निष्फळ ठरले. मोर्चातून एकच घोषणा घुमली – 'कम्युनिटी हॉल नको, आम्हाला हक्काचा बुद्ध विहार हवा!' हा संघर्ष बाबासाहेब डॉ. आंबेडकर आणि तथागत बुद्धांच्या विचारांच्या रक्षणाचा असल्याचा ठाम निर्धार पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

### महत्वाचे

## हिवाळी अधिवेशनाची सर्व कामे बंद करून कंत्राटदार निषेध नोंदवणार!




**संवाद मित्र जयंत साठे, नागपूर :** महाराष्ट्र शासनाने वर्षभरापासून झालेल्या कामांचे निधी अभावी देयके न दिल्याने सर्व प्रकारची हिवाळी अधिवेशनाची कामे बंद करण्याचे आवाहन नागपूर कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनचे अध्यक्ष सुबोध सरोदे यांनी आज मंगळवार दिनांक 28 ऑक्टोबर 2025 रोजी येथील प्रेस क्लबमध्ये घेतलेल्या पत्रपरिषदेत केले आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये लहान कंत्राटदारांची जवळपास 1500 लक्ष रुपयांची देयके प्रलंबित आहेत. यासाठी गेल्या वर्षभरात विविध प्रकारचे धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, लाक्षणिक उपोषण यासारखे लोकशाही मार्गाने आंदोलन केले होते. तसेच मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना या विषयावर संघटनेचे शिष्टमंडळ भेटून निवेदन दिले होते तथापि कंत्राटदारांच्या समस्यांकडे सरकार दुर्लक्ष करीत असल्याची कंत्राटदारांची भावना असल्याचे दिसून येते. त्यामुळे येत्या हिवाळी अधिवेशनाची कामे सर्व कंत्राटदार स्वयंस्फुर्तीने बंद करून आपला निषेध नोंदवणार आहे.

## बनवाडी येथे ममता HIMC प्रोजेक्ट 'जागृती' अंतर्गत मानसिक आरोग्य जनजागृती




**बनवाडी (नागपूर) :** ममता HIMC प्रोजेक्ट जागृती अंतर्गत बनवाडी येथे मानसिक आरोग्य जागृतीसाठी एक विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश महिलांमध्ये मानसिक आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे आणि ताण-तणावमुक्त निरोगी जीवनशैली स्वीकारण्यासाठी प्रोत्साहन देणे हा होता. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ममता HIMC संस्थेच्या समन्वयिका पल्लवी भांडारकर यांनी भूषविले. तर कार्यक्रमाचे मार्गदर्शन सौम्य कुमार यांनी केले. त्यांनी महिलांच्या मानसिक स्वास्थ्याचे महत्त्व, प्रसूतीनंतर होणारे भावनिक बदल, तसेच कुटुंबातील संवाद आणि आधार यांची गरज यावर सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात बनवाडी आणि शंकरपूर येथील गर्भवती माता, स्तनदा माता तसेच नवविवाहित महिलांचा उत्स्फूर्त सहभाग होता. उपस्थित महिलांनी कार्यक्रमादरम्यान विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे मिळवत सक्रिय सहभाग नोंदविला. कार्यक्रमात संवादात्मक चर्चा, प्रात्यक्षिके आणि सल्ला सत्रांद्वारे महिलांना मानसिक आरोग्याची जाणीव करून देण्यात आली. कार्यक्रमाची तयारी, नियोजन आणि संयोजन ममता HIMC चे सुपरवायझर योगेश राठोड व मंजुषा नासरे यांनी उत्कृष्टपणे पार पाडले. त्यांच्या समन्वयातून कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित महिलांनी अशा प्रकारचे मार्गदर्शन वेळोवेळी मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.




## विदर्भ मोलकरीण संघटनेच्या अध्यक्ष सुजाता भोंगाडे यांना बाबुराव (प.बा) सामंत संघर्ष पुरस्कार

**नागपूर :** केशव गोरे स्मारक ट्रस्टच्या वतीने विदर्भ मोलकरीण संघटनेच्या अध्यक्ष सुजाता भोंगाडे यांना बाबुराव (प.बा.) सामंत संघर्ष पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला आहे. मुंबईच्या गोरेगाव येथील केशव गोरे स्मारक ट्रस्टच्या गोरेगावकर इंग्लिश स्कूल खुले सभागृह मुंबई येथे स्त्री मुक्ती संघटनेच्या अध्यक्षा ज्योती म्हापसेकर, केशव गोरे स्मारक ट्रस्टच्या विश्वस्त अंजली वर्तक, युवराज मोहिते प्रामुख्याने हजर होत्या.यावेळी सामाजिक कार्यकर्त्या व विदर्भ मोलकरीण संघटनेच्या अध्यक्ष सुजाता भोंगाडे यांचा ज्योती म्हापसेकर यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. मानपत्र, स्मृती चिन्ह व पन्नास हजार रुपयाचा चेक देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी ज्योती म्हापसेकर म्हणाल्या की, सुजाता भोंगाडे ह्या असंघटित क्षेत्रातील महिला कामगारणा संघटीत करण्याचे काम करतात. विदर्भातील मोलकरणीना संघटीत करून त्यांना न्याय मी मिळवून देण्याचा प्रयत्न करीत आहेत. हा पुरस्कार त्यांच्या कार्याला समर्पित आहे. त्यांच्या भविष्यकालीन कार्यास हार्दिक शुभेच्छा. सुजाता भोंगाडे यांनी या पुरस्काराची प्ननास टकके रक्कम सामाजिक कृतधता निधीस देण्याची घोषणा केली.प्रास्ताविक युवराज मोहिते, संचालन सुभाष सोनवणे तर आभार प्रमोद नीगुडकर यांनी मानले.

सुजाता भोंगाडे यांचे डॉ. रूपा कुळकर्णी,विलास भोंगाडे,प्रीती नाकतोडे, अश्विनी भारतद्वाज, रोशनी गंभीर, अनुपमा कावळे, प्रफुल्लता बनसोड, प्रज्योती तावाडे, मंगला देठे, एकनाथ गजभिये यांनी अभिनंदन केले.

## सम्यक विपश्यना केंद्र त्रिमूर्तीनगर तर्फे गुनवंत विध्यार्थ्यांचा सत्कार

**नागपूर :** सम्यक विपश्यना केंद्र त्रिमूर्ती नगर यांच्यावतीने गुनवंत विध्यार्थ्यांचा सत्कार राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्रमोद रामटेके, जीवन गावंडे, प्रिती भालेकर तशेच संस्थेचे सदस्य अजाबराव पाटील या सर्वांच्या हस्ते गुनवंत विध्यार्थ्यांना मेडल व प्रमाणपत्र नोटबुक देऊन सत्कार केला. आणि ऊज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा देऊन सखोल मार्गदर्शन करणार आले. कार्यक्रमाचे संचालन सथ्येचे ऊपाध्यक्ष कांबळे आणि आभार प्रदर्शन सचिव वाहणे यांनी केले. या कार्यक्रमाला बोरकर साहेब स्मिता मेश्राम प्रिती गजघाटे अर्चना शेंडे यांच्या परिश्रमातून तशेच जेष्ठ नागरीक व महिला मंडळ आणि परिसरातील नागरिक यांच्या ऊपस्थितीत कार्यक्रम पार पडला.



## नागपूर विभागीय आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चावर प्रवीण आवळेची निवड



**नागपूर :** आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते प्रविण आवळे यांची नागपूर विभागिय आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा अध्यक्ष पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. प्रविण आवळे हे आंबेडकरी चळवळीतील सक्रिय नेते आहेत त्यांच्या नियुक्तीमुळे नागपूर विभागातील वर्धा, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया या जिल्ह्यात कार्यकर्त्यांना नविन ऊर्जा मिळाली आहे सदर नियुक्ती आंरिमो चे राष्ट्रीय अध्यक्ष नारायणराव बागडे यांच्या आदेशानुसार करण्यात आली आहे सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# डॉ. आंबेडकरांच्या शिक्षणदर्शनावर राष्ट्रीय चर्चा

## नागपूर विद्यापीठात इटरचेयर कार्यक्रम

**नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन विभाग आणि सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय (अभीमत) विद्यापीठ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'शिक्षणाचा इतिहास आणि दलित, आदिवासी आणि महिलांची मुक्तता' या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय इटरचेयर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.




कार्यक्रमाच्या उद्घाटन सत्राचे अध्यक्षस्थान मा. कुलगुरू महोदया डॉ. माधवी खोडे - चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. अविनाश फुलझेले यांनी भूषविले, तर प्रमुख उद्घाटक व मुख्यवक्ते म्हणून प्रा. सुरेश बाबू (जेएनयू, नवी दिल्ली) उपस्थित होते.

सिम्बायोसिस विद्यापीठाच्या डॉ. आंबेडकर चेयरचे विभागप्रमुख डॉ. अजय चौधरी यांनी प्रास्ताविक करून कार्यक्रमाचा शुभारंभ केला. उद्घाटक प्रा. सुरेश बाबू यांनी 'डॉ. बी.आर. आंबेडकरांचे शिक्षण आणि सामाजिक मुक्तीचे तत्वज्ञान' या विषयावर मार्गदर्शन करतांना डॉ. आंबेडकरांच्या शिक्षणदर्शनाचा सखोल वेध घेतला. त्यांनी आंबेडकरांना विद्यार्थी म्हणून आलेले अनुभव, त्यांचा जॉन ड्युई यांच्याशी असलेला बौद्धिक संबंध आणि मानसशास्त्र ते सामाजिक मानसशास्त्र या प्रवासाचे विश्लेषण केले. त्यांनी तळागाळातील लोकांच्या शिक्षणासाठी डॉ. आंबेडकरांचे तत्त्वज्ञान आजही किती मूलगामी व कारागर आहे याची शास्त्रीय मांडणी आपल्या भाषणात केली.

उद्घाटन सत्रानंतर विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांमुळे चर्चा अधिक अर्थपूर्ण झाली. विभागप्रमुख डॉ. अविनाश फुलझेले यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात, डॉ. आंबेडकरांनी शिक्षणाबरोबरच शीला ला महत्त्व कसे दिले याचे उदाहरण देऊन सत्राचा समारोप केला व कार्यक्रमाचे संचालन डॉ सुनीता सावरकर तर डॉ. गौतम कांबळे यांनी आभार प्रदर्शन केले.

यानंतर झालेल्या पॅनेल चर्चेत मयूर कुडुपडे, दिल्ली, मोनालिसा बेहरा, पुणे आणि डॉ. लक्ष वेंकटरमण, सहयोगी प्राध्यक, स्कूल ऑफ लिबरल आर्ट, एम.आ. टी. पुणे,यांनी सहभागी होत 'शिक्षण आणि सामाजिक परिवर्तन' या विषयावर विचार मांडले. या सत्राचे अध्यक्ष प्रा. सुरेश बाबू होते.

कार्यक्रमाच्या अंतिम सत्राचे अध्यक्षस्थान डॉ. अजय चौधरी यांनी भूषविले.

या सत्रात डॉ. प्राची पाटील यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कवितांतील शिक्षणविषयक दृष्टिकोनाचे विश्लेषण केले, तर डॉ. मिलिंद घाटे यांनी दलित समाजाच्या शैक्षणिक संघर्षावर आणि डॉ. धनंजय सोनटक्के यांनी स्त्रीशिक्षण व पितृसत्तेविरोधातील संघर्षावर मांडणी केली.

या कार्यक्रमासाठी सहायक प्रा. हेमांगी कडलक, प्रा. रमेश शंभरकर, डॉ. मंगेश जूनघरे, डॉ. मोहन वानखेडे, डॉ. सरोज डांगे, तसेच एम.ए.च्या प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थी व सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**PROPERTY FOR SALE**




Prime Land with Construction for Sale
**Wela (Hari), Shankarpur Road, Nagpur (Gramin)**
Perfect for Educational Institutions:
Area 0.46 hectares (50,000 Sq. Ft) with construction around 35000 Sq. Ft., Ideal for Schools, College, Training Center, Residential Tution College, Hotel, Hostel, Ambusman Park

**Contact : Sulay 9860361121**

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. **RNI No. MAHMAR 2020/84035** Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648